# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई विरार यांचे कार्यालय,**
**रामनगर, सृष्टी, मिरारोड पुर्व. ता.जि. ठाणे**

दुरध्वनीक्रमांक ०२२-२९४५१००१

Mail:pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र.१४७-२३** **दिनांक ११/०५/२०२३**

## काशिमीरा, मिरारोड पुर्व येथील खुनाच्या गुन्ह्यातील ०६ वर्षापासुन पाहिजे असलेल्या आरोपीतास काशिमीरा पोलीस ठाणेकडुन अटक.

दिनांक ११.०७.२०१६ रोजी मयत नामे सचिन नारायण मोहीतेट वय-२५ट रा.१ बी, ३०६, पाटलीपुत्र कॉम्प्लेक्स, आनंद नगर, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई याचे आरोपीत १)सत्याकुमार भागीरथी पानीग्रही उर्फ धिरेनकुमार पिल्ले उर्फ कुमार २) संदिप पोपट कुंभार ३) कपिल प्रभाकर जाधव ४) मल्या जगवंदु बारीक उर्फ बाबु ५)अकलाक इरशाद हुसैन खान उर्फ चॉंद तसेच त्याचे साथीदार आरोपीत ६)सुधीर मयाशंकर शुक्ला ७)अमिर गुलाल रसुर तांबे ऊर्फ अम्मु ८)सय्यद जफरहुसेन जाफर हुसेन रिझवी ९)मोहमंद राशीद मोहमंद शफिक कुरेशी तसेच पाहीजेत आरोपी १०)प्रमोद जेना ऊर्फ निलु ११)सौम्यराज खिरोद दास यांनी आपसात संगनमत करुन यापुर्वी घेतलेले ३९ लाख रुपये परत देत नाही याचा मनात राग धरुन मयत सचिन नारायण मोहिते याचे अपहरण करुन त्यास आरोपी सत्याकुमार पानीग्रही याच्या गोरेगांव, मुंबई येथील ऑफीसमध्ये नेवून मारहाण केली तसेच काशिमीरा, मिरारोड पुर्व येथील आर.के. प्रिमीयम हॉटेल लॉजींग येथील रुममध्ये आणून पुन्हा मयत सचिन मोहिते याचे पोटावर तसेच गुप्तांगावर लाथाबुक्क्याने बेदम मारहाण केल्याने सचिन मोहिते याचे शरीर थंड पडल्याने तो मयत झाला असावा असे समजुन त्यास आरोपी सत्याकुमार पानीग्रही याच्या टोयोटा कोरोला गाडीत घालून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मनोर, जि.पालघर जवळील सुर्यानदीचे पुलावरुन वाहत्या पाण्याच्या प्रवाहात टाकून दिल्याने त्याबाबत सफाळा पोलीस ठाणेत अकस्मात मृत्यू रजि. क्र.१४/२०१६ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

संजय देवराम निकुंबे, पोलीस निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-३, गु.अ.वि., ना.म.जोशी मार्ग, मुंबई पोलीस दल यांना मिळालेल्या माहितीवरून वर नमुद आरोपी यांनी पैशाचे कारणावरून सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वर नमुद आरोपी विरुध्द सफाळा पोलीस ठाणेत, जिल्हा पालघर येथे गुन्हा रजि. क्र. ००/२०१७ प्रमाणे गुन्हा दाखल करून गुन्हयाचे घटनास्थळ काशिमीरा पोलीस ठाणे हद्द असल्याने वरीष्ठाचे आदेशाने सदरचा गुन्हा काशिमीरा पोलीस ठाण्यात वर्ग झाल्याने काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. I ६२/२०१७ भा.दं.वि.सं.कलम ३०२,३६४,३६४(अ),३६५,२०१,३४२,१७०,३२३,५०६,३४ प्रमाणे दिनांक १२.०२.२०१७ रोजी ०५.५९ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयात वरील आरोपी क्र.०१ ते ०९ यांना अटक करुन त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते.

सदर गुन्हयातील पाहीजेत आरोपी प्रमोद जेना ऊर्फ निलु तसेच सौम्यराज खिरोद दास हे गुन्हा घडले पासुन ०६ वर्षापासुन पाहिजे आरोपीत होते. नमुद आरोपीचा शोध घेतला असता तो मिळुन येत नव्हता. पाहीजे आरोपी सौम्यराज खिरोद दास याचा सद्याचा कार्यरत मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्याचे तांत्रीक माहितीचे आधारे नमुद पाहीजेत आरोपी सौम्यराज खिरोद दास, वय-२७ वर्षे, रा.रुम क्र.१३०२, डी विंग, एव्हरशाईन, डी-१, रुस्तमजी ग्लोबल सिटी, विरार पुर्व, ता.जि.पालघर मुळ रा.ग्राम बालीसाही, पोस्ट-बालीकुदा, जि.जगतसिंगपुर

राज्य-ओरीसा हा ग्लोबल सिटी, जुने विवा कॉलेज, विरार, जि.पालघर येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास लागलीच ताब्यात घेवुन केले चौकशीत सदर गुन्हयात त्याचा सहभाग निष्पन्न झाल्याने दिनांक १०.०५.२०२३ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री. विनायक नरळे, सहा.पोलीस आयुक्त (मुख्यालय), श्री. विलास सानप, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली काशिमीरा पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संदिप कदम, स.पो.नि. श्री. निरीक्षक प्रशांत गांगुर्डे, स.फौ. अनिल पवार, पो.हवा.निलेश शिंदे,राहुल सोनकांबळे, पो.अंम. रविंद्र कांबळे, म.पो.अंम. धनश्री गुळदगडे यांनी केली आहे.

----०००----